# सृष्टिज्ञान



**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :** रमेश दाते
**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे, सत्यजित जोशी
**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे



या अंकाची किंमत : रु. ४०.००
वार्षिक वर्गणी : रु. ४००.००



**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०-२४४७४२९५
ई-मेल : sci.vibha@gmail.com



या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.


# दोन देवपुत्र नव्हेत तर विज्ञानाचे दोन वारकरी -

जयंत सहस्त्रबुद्धे व जयंत नारळीकर या दोघांना विज्ञानपंढरीच्या नवीन वाटा शोधण्याचे व त्या रुजविण्याचे श्रेय यायलाच पाहिजे. कै. जयंत सहस्त्रबुद्धे हे विज्ञानभारतीचे राष्ट्रीय संघटन सचिव होते. त्यांचे २ जून रोजी अत्यंत दुःखद निधन झाले. ते ५६ वर्षाचे होते. ३ सप्टेंबर २०२२ रोजी एका दुर्घटनेत ते जबर जखमी झाले, त्यांनतरच्या उपचारामधून ते आता परत आपला कार्यभार सुरू करतील अशी आशा वाटत असतानाच त्यांचे निधन झाले.



विज्ञान भारतीचे जाळे देशभर विस्तारण्याचे महत्वाचे योगदान जयंतरावांनी केले. भारतीय वैज्ञानिकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अधोरेखित करण्याचे अलौकिक काम गेली दोन वर्षे करीत होते. १९८९ मध्ये संघ प्रचारक म्हणून त्यांची झालेली निवड त्यांनी सार्थ ठरविली. त्यानंतर त्यांनी विज्ञानभारतीला नवीन दिशा दिली. विद्यार्थी विज्ञान मंथन ही स्पर्धापरीक्षा, टेक फोर सेवा, इंडियन इंटरनॅशनल सायन्स फेस्टिवल, विश्व वेद विज्ञान संमेलन अशा नवनवीन उपक्रमांचा प्रारंभ त्यांनी केला. त्याचबरोबर वर्ल्ड आयुर्वेद फाऊंडेशन, ग्लोबल इंडियन सायंटिस्ट आणि टेक्नोक्रॅट्स फोरम, नॅशनल आयुर्वेद विद्यार्थी संघही त्यांनीच निर्माण केलेल्या शाखा.

सृष्टिज्ञान मासिक विज्ञानभारती संस्थेने चालविण्यास घ्यावे ही त्यांचीच इच्छा होती. सातत्याने कार्यरत असणाऱ्या या कर्मयोग्याला खरी श्रद्धांजली वाहण्यासाठी सृष्टीज्ञानसाठी वाहून घेणे हाच एकमेव


SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
"Srishtidnyan" Monthly magezine owned by Vidnyan Bharati, Pune, Printed and published by Ramesh Date. Printed at Pratima Mudran, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune - 411038. Published at 1261, Shukrawar Peth, Subhashnagar, Pune - 411002.
Editor - Ramesh Date

मार्ग आहे. शिरीष पटवर्धन या सुहृदाने त्यांचे केलेले वर्णन खाली नमुद केले आहे.

*विज्ञान वारकरी, निघाला वैकुंठी ।*
*लगभग सुरु झाली वैकुंठधामी,*
*आलिंगन देण्या लाडक्या भक्ताला ।*
*वैकुंठीचा राणा, आतुर झाला ।।*

*विज्ञान अध्यात्म भिन्न जरी शब्द ।*
*अभंग एकत्व त्यांचे असे ।*
*जाणूनी हा धर्म, देह झिजवला,*
*राष्ट्रभाव मनोमनी जागविला ।।*

✻

प्राध्यापक डॉ. जयंत नारळीकर यांचे नाव घेतले नाही असा विज्ञानप्रेमी महाराष्ट्रात तरी आढळणार नाही. प्रा. नारळीकर हे खगोलशास्त्रज्ञ व आयुकाचे संस्थापक म्हणून जेवढे प्रसिद्ध आहेत, त्यापेक्षाही विज्ञानाची पाळेमुळे तळागाळात रुजविणारा विज्ञान वारकरी म्हणून अधिक प्रसिद्ध आहेत. ब्रह्मांडाची उत्पत्ती व विकास यावरचे त्यांचे संशोधन जगभरात गाजले. खगोलशास्त्रातील मूलभूत संकल्पना तसेच गुरुत्वीय बलाविषयीचे त्यांचे विचार विज्ञानाला नवी दिशा देणारे आहेत.

त्यांना पहिला गोविंद स्वरूप जीवनगौरव पुरस्कार देऊन नुकतेच गौरवण्यात आले. हा पुरस्कार ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेमार्फत खगोलशास्त्रातील असाधारण कामगिरीबद्दल दिला जाणार आहे. या पुरस्काराची घोषणा सन २०२२ मध्ये केली गेली व प्रथम पुरस्काराचे वितरण नुकतेच केले गेले. प्रा. गोविंद स्वरूप हे भारतीय खगोलशास्त्राचे आद्यरचेते होते. त्यांच्या स्मृतीनिमित्त हा पुरस्कार दिला जाणार आहे. सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व दीड लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. एस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेने स्थापन केलेल्या एका समितीद्वारे नामांकन मिळालेल्यांची छाननी करून त्यांच्या कामगिरीबद्दल पुरस्कार दिला जातो.


Govind Swarup

प्रा. डॉ. गोविंद स्वरूप हे भारतीय रेडिओ खगोलशास्त्राचे जनक. खोडद येथील मीटर तरंगलांबीची महाकाय रेडिओ दुर्बीण (जीएमआरटी) हा त्यांचा प्रकल्प आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्षणीय ठरला. भारतातील रेडिओ खगोलशास्त्र लौकिक जगभर नेणारे उमेद व उत्साही शास्त्रज्ञ व पट्टीचे विज्ञानप्रसारक म्हणून त्यांची बरोबरी करणारे दुसरे नांव नाही.



**रमेश दाते**
sci.vibha@gmail.com

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा मुद्रण, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८ येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२ येथे प्रसिध्द केले.
संपादक : रमेश दाते